उंट वाळवंटातील जहाज



जॉन वाटर्स, चित्र: रेनॉल्ड रफ़िन्स, मराठी: अश्विनी बर्वे

उंट एक उपयोगी प्राणी आहे. त्याच्या लांब पापण्या सुद्धा एका उद्देशा साठी आहेत. वाळू पासून त्या त्याचे रक्षण करतात. तो वाळवंटात एक आठवडा बिना पाण्याचा प्रवास करू शकतो आणि मग एकदा तो ९० लिटर पाणी पिऊन आपली तहान भागवू शकतो. जर त्याला गरम आणि उजाड जमिनीवर काही खायला मिळाले नाही तर तो आपल्या कुबडात जमा केलेल्या चरबीच्या साहय्याने जिवंत राहू शकतो. या कारणांमुळे उंटाला वाळवंटातील सगळ्यात मूल्यवान संपत्ती समजले जाते.

जॉन वाटर्स सांगतात की उंट वाळवंटासारख्या कठीण परिस्थितीत सुद्धा तगून राहतात.ज्या मुलांनी उंट बघितले नाही आणि वाळवंट सुद्धा पाहिले नाही ते लोक या असामान्य प्राण्याचे वर्णन वाचून आकर्षित होतील,मोहित होतील.


उंट

वाळवंटातील जहाज

जॉन वाटर्स

चित्र: रेनॉल्ड रफ़िन्स

मराठी: अश्विनी बर्वे



उंट

वाळवंटातील जहाज


जॉन वाटर्स

चित्र: रेनॉल्ड रफ़िन्स






उंट तिथे राहतात जिथे उष्णता आणि ओसाड जमीन असते. उंट वाळवंटात राहतात. लोक उंटावरून प्रवास करतात, उंट जड ओझे सुद्धा वाहून नेतात, ते गालिचे आणि नारळ, खजूर आणि पाम ऑईल, मीठ, धान्य अशा सगळ्या प्रकारचे सामान वाहून नेतात. उंटाला 'वाळवंटातील जहाज' म्हटले जाते.



तुम्ही कधी वाळूत चालले आहात का? तुमचे पाय वाळूत रुतले आहेत का?

उंट वाळूत सहज चालू शकतात, त्यांचे रुंद, मुलायम, जाड पाय उंटाला वाळूत रुतण्यापासून किंवा खडकावरून घसरण्यापासून वाचवतात.







कधी वाळू किंवा माती तुमच्या डोळ्यात गेली आहे का?

उंटाच्या पापण्या लांब आणि मोठ्या असतात त्यामुळे वाळू त्यांच्या डोळ्यात जाऊ शकत नाही. वाळूपासून त्यांचे डोळे वाचतात.









जेव्हा आपण काही तास पाणी पीत नाही, तेव्हा आपल्याला खूप तहान लागते. उंटाना एवढ्या लवकर तहान लागत नाही. उन्हाळ्यात जेव्हा खूप उष्णता असते, तेव्हा सुद्धा उंट आठ दिवस बिना पाण्याचा राहू शकतात.

हिवाळ्यात तर काही उंट आठ आठवड्यापर्यंत पाणी पिल्या शिवाय राहू शकतात.


तेव्हा ते रसदार रोपे आणि झाडे खाऊन पाण्याची आपली गरज भागवतात.






खूप उष्णता असेल अशा काळात माणूस एक किंवा दोन दिवस पाण्याशिवाय जिवंत राहू शकतो.

वाळवंटात उन्हाळ्याच्या दिवसात वाळूचे तापमान १५० डिग्री फारेनहाईट पर्यंत पोहचू शकते. जर उंटाचे तापमान सुद्धा इतके असेल तर तो मरून जाईल. आपण पण मरून जाऊ. पण उंट उष्ण वाळवंटात थंड राहतो.



उंटाला घाम येतो. घामामुळे तो थंड राहतो. आपण पण यामुळेच थंड राहतो. घामामुळे आपल्या शरीराचे तापमान जवळपास ९८.६ डिग्री फारेनहाइट ठेवले जाते.


जेव्हा आपल्याला घाम येतो, तेव्हा आपल्या शरीरातून पाणी बाहेर जाते.जर खूप गरमी असेल आणि तुम्हाला खूप घाम आला, तर तुम्ही जास्त पाणी बाहेर टाकाल. मग तुम्हाला खूप पाणी प्यावं लागेल.





वाळवंटात सकाळी सकाळी उंटाचे तापमान ९३ डिग्री फारेनहाईट असते. दिवसा उंटाचे तापमान वाढते पण खूप हळूहळू.उंटाचे तापमान १०५ डिग्री फारेनहाईट पर्यंत पोहचायला दुपार होते. मग त्याला घाम यायला सुरुवात होते. रात्री उंटाचे तापमान परत ९३ डिग्रीपर्यंत खाली जाते.












जर दिवसा खूप गरमी असेल तर माणूस लवकरच गरम होईल, पूर्ण दिवसभर त्याला घाम येईल.

जेव्हा माणसाला खूप घाम येतो, तेव्हा त्याचे रक्त बदलते. माणसाचे रक्तच उष्णतेला त्याच्या त्वचे पर्यंत पोहचवते. त्यामुळे त्याचे रक्त घट्ट होत जाते. जितका जास्त घाम वाहतो, तेव्हा त्याचा काही भाग त्याच्या रक्तातून येत असतो. माणसाचे रक्त तितकेच घट्ट होत जाते. मग रक्त सहजपणे त्वचेपर्यंत पोहचत नाही. तेव्हा माणूस उष्णतेपासून सुटका करून घेऊ शकत नाही. तेव्हा माणूस जास्त गरम होत जातो. जर तेव्हा त्याला पाणी मिळाले नाही तर त्याचा मृत्यू होऊ शकतो.







जेव्हा उंटाला घाम येतो, तेव्हा त्याच्या रक्तात काही बदल होत नाही. त्याच्या शरीरातून जे पाणी बाहेर पडते, ते त्याच्या रक्तातून येत नाही. उंटाचे पाणी शरीरातील दुसऱ्या तरल पदार्थातून आणि शरीरातील इतर पेशींमधून येते. म्हणून उंटाचे रक्त नेहमी पातळ राहते. रक्त सहजपणे त्याच्या शरीरातून वाहू शकते आणि त्याच्या त्वचेपर्यंत जाऊ शकते. घाम उष्णतेला त्याच्या शरीरापासून सारखे दूर ठेवतो.




लोकांना वाटते की उंटाचे पोट खास प्रकारचे असेल ज्यात तो पाणी साठवून ठेवतो. त्यांना वाटते की उंट तिथेच जास्तीचे पाणी साठवून ठेवत असणार. काही लोकांना वाटते की उंट आपल्या कुबडामध्ये पाणी ठेवतो.






अरबी उंटांना एक कूबड़ असते.




आशियाई उंटांना दोन कूबड़ असतात. कोणताही उंट आपल्या कुब्दात पाणी साठवून ठेवत नाही. पण उंट एवढ्या लवकर पाणी खर्च करत नाही जेवढ्या लवकर माणसं करतात.




उंटाचे केस सुद्धा त्याला थंड ठेवतात. उंटाचे शरीर काही इंचापर्यंत केसाने झाकलेले असते. केसामुळे प्रखर उष्णतेपासून उंटाचे शरीर झाकले जाते, उष्णता तिथे रोखली जाते. पण वाळवंटात उंटाच्या केसांचे कांबळे उष्णतेला शरीराच्या बाहेर ठेवते.









बहुतांश प्राण्यांच्या शरीरावर चरबीचा एक स्तर असतो. आपल्या शरीरावर सुद्धा चरबी असते. चरबी त्वचेच्या खाली असते. चरबी एक इन्सुलेटर असते. चरबी उष्णता धरून ठेवते आणि प्राण्यांना ऊबदार ठेवायला मदत करते. उंटाच्या पूर्ण शरीरावर चरबीचा थर नसतो.म्हणून तो आपल्या त्वचेच्या साहय्याने उष्णतेला रोखून धरतो.



तथापि, सर्व प्राण्यांना जगण्यासाठी चरबीची आवश्यकता असते. उंटाची चरबी त्याच्या कुबड्यात साठवली जाते. दोन कुबड्या असलेल्या उंटाच्या दोन्ही कुबड्यांमध्ये चरबी असते. जर उंटाला नियमित अन्न मिळत नसेल तर तो त्याच्या चरबीचे अन्नात रुपांतर करतो.









प्राणी मल बाहेर काढण्यासाठी पाण्याचा वापर करतात. आपण पण तेच करतो. तुमच्या शरीरात असलेले पाणी मळ बाहेर काढण्यासाठी वापरले जाते. जेव्हा तुम्ही लघवी करता तेव्हा तुमच्या शरीरातून मल बाहेर जातो. उंटाच्या बाबतीतही असेच घडते. त्याशिवाय उंट फार वेळा लघवी करत नाही. लोकांना दिवसातून चार किंवा पाच वेळा लघवीला जावे लागते, कधी कधी जास्त. उंट एका वेळी थोडीशी लघवी करतो. त्यामुळे त्याच्या शरीरातील पाण्याची भरपूर बचत होते.




उष्ण वाळवंटात आठ किंवा त्याहून अधिक दिवस प्रवास केल्यानंतर उंटालाही तहान लागते. उंट अनेक दिवस पाण्याशिवाय राहिल्यास ते बारीक होतात आणि त्यांची हाडे दिसू लागतात. त्यांचे पोट आत जाते. मग त्यांना भरपूर पाणी हवे असते. मग उंटावरील ओझे काढून टाकले जाते जेणेकरून ते खाली वाकून पाणी पिऊ शकतील. काही उंट दहा मिनिटे किंवा त्याहून अधिक काळ पाणी पितात. ते एकाच वेळी ९०-लिटर पाणी पिऊ शकतात!









पाणी पिऊन बराच वेळ विश्रांती घेतल्यावर उंट पुन्हा आपल्या पाठीवर मीठ, धान्य, चटया, चामडे आणि इतर अनेक गोष्टींचे ओझे लादले जाते. मग "वाळवंटाचे जहाज" दुसऱ्या गरम, आणि कधीकधी निर्जल, लांब प्रवासासाठी तयार होते.